# मा. मंत्री (वित्त) श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी मंगळवार, दिनांक १८ जून २०१९ रोजी केलेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय भाषणाची ठळक वैशिष्ट्ये.

## भाग–१

- शेतकरी, युवक, महिला, दिव्यांग समाजातील वंचित घटक अशा सर्व घटकांना स्पर्श करणारा सर्वसमावेशक, रोजगाराभिमुख, प्रगतीशील अर्थसंकल्प.
- नवीन औद्योगिक धोरण २०१९ अंतर्गत नवा मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम.
- राज्यातील ५० तालुक्यात सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांसाठी औद्योगिक पार्क निर्मिती करणार.
- सन २०२५ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन अमेरिकन डॉलर म्हणजे रुपये ७० लाख कोटी करण्याकरिता सल्ला देण्यासाठी नामांकित अर्थतज्ज्ञ व विशेष तज्ञांचा सहभाग असलेल्या महाराष्ट्र आर्थिक परिषदेचे पुनरुज्जीवन करण्यात येणार.
- परंपरागत ग्रामीण अर्थव्यवस्थेचे प्रमुख घटक असलेल्या १२ बलुतेदारांच्या सक्षमीकरणासाठी खादी ग्रामोद्योग मंडळास रुपये १०० कोटी अनुदान.
- विधवा, परित्यक्त्या व घटस्फोटीत महिलांच्या स्वंयरोजगार या नवीन योजनेकरिता रुपये २०० कोटी.
- अल्पसंख्याक महिला व युवकांच्या रोजगारासाठी कार्यक्रम रुपये १०० कोटी.
- नक्षलग्रस्त भागातील रोजगार निर्मितीकरिता तीन वर्षांसाठी रुपये ५०० कोटीचा कार्यक्रम यावर्षी रुपये १५० कोटी.
- दहावी व बारावी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास योजना.
- पोलीस दलांच्या सक्षमीकरणाकरिता ४ हजार ६४९ पोलीस शिपाई यांची पदे भरणार.
- धनगर समाज बांधवांच्या विकासासाठी २२ प्रकारच्या विविध योजना राबविणार. या योजनांकरिता रुपये १००० कोटी नियतव्यय राखीव.
- संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेअंतर्गत अर्थसहाय्यात रुपये ६०० वरुन रुपये १,००० इतकी वाढ. एक अपत्य असलेल्या विधवा महिलेस रुपये ११०० आणि दोन अपत्ये असलेल्या विधवा महिलेस रुपये १२०० मिळणार.
- दिव्यांगासाठी घरकूल योजनेसाठी रुपये १०० कोटी नियतव्यय.
- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जन्मशताब्दी वर्षाप्रीत्यर्थ कार्यक्रम रुपये १०० कोटी.

- इतर मागासवर्गीय महामंडळाकरिता रुपये २०० कोटी अनुदान.
- इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ३६ वसतीगृहे.
- इतर मागास प्रवर्गातील मुलींकरिता नवीन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना.
- इतर मागास प्रवर्गातील गुणवंतांच्या सत्काराकरिता स्वर्गीय वसंतराव नाईक पुरस्कार योजना. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृह, सार्वजनिक जय मल्हार व्यायाम शाळा, आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती संग्रहालय उभारण्याचे प्रस्तावित.
- तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत यात्रेकरुंच्या सेवेकरिता पायाभूत सुविधांचा विकास.

  श्री. क्षेत्र कपिलधारा, ता. जि. बीड.

  श्री. संत सेवालाल महाराज, पोहरादेवी, ता. मानोरा, जि. वाशिम.

  कुणकेश्वर, ता.देवगड, जि. सिंधुदुर्ग.

  आंगणेवाडी, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग.

  सद्गुरु सखाराम महाराज अंमळनेर, जि. जळगाव.

  संत निवृत्तीनाथ महाराज मठ, त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक.
- महिला बचत गटाला कायदेविषयक जागृतीकरिता नवीन प्रज्वला योजना.
- ग्रामीण भागातील महिला आर्थिक सक्षमीकरणाकरिता नवतेजस्वीनी योजना.
- चूलमुक्त महाराष्ट्र व धूरमुक्त महाराष्ट्र हा पथदर्शी प्रकल्प राबविणार.
- टंचाई व दुष्काळग्रस्तांना विविध योजनांद्वारे भरीव आर्थिक मदत.
- जलसंपदा विभागासाठी १२ हजार ५९७ कोटी १३ लक्ष ८९ हजार इतकी भरीव तरतूद.
- सुक्ष्म सिंचनासाठी शेतकऱ्यांना देण्यात येत असलेल्या अनुदानात वाढ यासाठी रुपये ३५० कोटी नियतव्यय.
- गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेची व्याप्ती वाढवून ती शेतकऱ्यांच्या कुटुंबांनाही लागू करण्यात येणार. विमाछत्र मिळणाऱ्या व्यक्तींची संख्या ५ कोटी. याकरीता रुपये २१० कोटी नियतव्यय.
- राज्यातील ४ कृषि विद्यापीठांना संशोधन व इतर भौतिक सुविधांकरिता तीन वर्षात रुपये ६०० कोटी एवढे अनुदान.
- रायगड किल्ल्याच्या जतन व संवर्धनाकरिता तसेच शिवसृष्टी प्रकल्पाकरिता अर्थसहाय्य.
- बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेसाठी १० कोटी.
- राज्यातील कोतवालांच्या मानधनात ५० टक्के वाढ, ५० वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या कोतवालांच्या मानधनात तिप्पटीने वाढ.

- देशाचे माजी पंतप्रधान, भारतरत्न स्वर्गीय अटलबिहारी वाजपेयी यांचे भव्य स्मारक मुंबईत उभारणार.
- सर जे. जे. कला, वास्तुशास्त्र आणि उपयोजित कला महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधांकरिता रुपये १५० कोटी अनुदान.
- न्यायालयीन इमारती व निवासस्थानाकरिता राज्यसरकारची विशेष योजना.
- सन २०१९-२० या वर्षासाठी अंदाजित महसुली जमा रुपये ३ लाख १४ हजार ६४० कोटी १२ लाख.
- सन २०१९-२० या वर्षासाठी अंदाजित महसुली खर्च ३ लाख ३४ हजार ९३३ कोटी ६ लाख.
- सन २०१९-२० या वर्षासाठी अंदाजित महसुली तूट रुपये २० हजार २९२ कोटी ९४ लाख.
- सन २०१९-२० या वर्षाचा अतिरिक्त अर्थसंकल्प रुपये १ हजार ५८६ कोटी ५५ लाख.

* * * * *